




दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com








सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २४ वा | सोमवार, दि. ११ ऑगस्ट २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR



**विकणे /भाड्याने देणे आहे**

वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.

**संपर्क : डी. बी. शिंदे**

**मो.: ९५७९४२१४६५ ८२७५२७४२५३**

**पत्ता:** अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला


# फडणवीस, तुमच्या बुडाला का आग लागली आहे ?

**दत्तकुमार खंडागळे**
**मो.9561551006**

लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहूल गांधी यांनी पत्रकार परिषद घेवून थेट पुराव्यासह निवडणूक आयोगाला नागडे केले. निवडणूकीत कसा कसा घोटाळा केला गेला, निवडणूक आयोगाशी संगनमत करत लोकशाहीचा गळा कसा कसा घोटला ? याचे तपशीलवार विश्लेषन करत आयोगाच्या अंगावर एक कापड ठेवले नाही. विशेष म्हणजे हे सगळ सांगत असताना देवेंद्र फडणवीस नावाच्या माणसाचे राहूल गांधी यांनी कुठेही नाव घेतले नाही. त्यांचा साधा उल्लेखही केला नाही. तरीही भाजपवाले आणि फडणवीस का अस्वस्थ झालेत ? लगेच भाजपाचे नेते आशिष शेलार यांनी पत्रकार परिषद घेत राहूल गांधींच्यावर टिका केली. तोवर महाराष्ट्राचे फार फार फार बुध्दीमान, नितीमान, स्वच्छ चारित्र्याचे, एकवचनी, एक बाणी नाही पण एक वाणी म्हणूया. (म्हणजे राष्ट्रवादीशी कधीही, कदापीही युती करणार नाही, वेगळा विदर्भ झाल्याशिवाय लग्न करणार नाही, अजित पवारांना चक्की पिसायला पाठवू वगैरे वगैरे अशा शपथा घेणारे) एक वचनी (कर्ज माफी करणार, धनगर आरक्षण देणार, मराठा आरक्षण देणार वगैरे वगैरे वचन देणारे) अशा थोर थोर थोर मुख्यमंत्र्यांच्या म्हणजे देवेंद्र फडणवीसांच्या बुडाला अचाक आग लागली. मग त्यांनीही लगेच राहूल गांधींच्यावर टिका केली. राहूल गांधींच्या मेंदूची चिप चोरीला गेल्याचे त्यांनी म्हंटले आहे. राहूल गांधींनी निवडणूक आयोगावर टिका केली. आयोगाला नागडे केले असताना फडणवीस का अस्वस्थ होत आहेत ? त्यांच्या बुडाला का आग लागली आहे ? हा प्रश्न पडल्याशिवाय रहात नाही.

महाराष्ट्रात साधारण आठ-दहा महिन्यापुर्वी विधानसभेच्या निवडणूका झाल्या. त्या आधी लोकसभेला भाजपाचा सुफडासाफ झाला होता. राज्यात भाजपाची कुठलीही लाट नव्हती. बहूतेक जनमाणस भाजपाच्या विरोधात होते. असे असताना अवघ्या सहा महिन्यात निवडणूक होते काय आणि भाजपा सर्वात मोठा पक्ष होतो काय ? कॉंग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना या तिन्ही पक्षाचे मिळून शंभरही आमदार निवडूण येत नाहीत. देशात २०१४ ला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची प्रचंड लोकप्रियता होती. कॉंग्रेसच्या विरोधात प्रचंड मोठी संतापाची लाट होती. त्यावेळी महाराष्ट्रात भाजपाचे जेवढे आमदार निवडूण आले नाहीत तेवढे आमदार कालच्या विधानसभा निवडणूकीत निवडूण आले आहेत. या निकालाने उमेदवारही अचंबीत झाले होते. अनेक चांगले चांगले नेते पडले आणि ज्यांची काहीच औकाद नाही असे भाजपाचे काही टूकार लोक मोठ्या मताधिक्याने निवडूण आले. हे नेमके कसे निवडूण आले ? असा काय चमत्कार झाला ? हे एक मोठे गौडबंगाल होते. राहूल गांधींनी नेमके तेच गौडबंगाल बाहेर काढले. निवडणूक आयोगाला हाताशी धरत कसा कसा मतांचा घोटाळा केला ? ते समोर आणले. त्यामुळेच देवेंद्र फडणवीसांच्या बुडाला आग लागली आहे. चोराच्या मनात नेहमी भिती असते. दुस-या कुणाचे नाव जरी उच्चारले तरी त्याला वाटते आपलेच नाव घेतले असावे. आपल्याला कुणी तर पाहिलं असेल, कुणीतर आपली चोरी पकडेल असं चोरट्याला नेहमी



वाटत असतं. अशाच भयगंडाने पछाडलेल्या देवेंद्र फडणवीस यांचा म्हणूनच तीळपापड होतो आहे. म्हणूनच ते व त्यांची पिलावळ राहूल गांधींच्यावर तुटून पडले आहेत. उगाचच देवेंद्र फडणवीसांच्या बुडाला आग लागलेली नाही. त्यांनी केलेल्या पापाचे त्यांना भय वाटते आहे. गुन्हेगार कितीही चालाख असला, त्याने शिताफीने गुन्हा दडपला असला तरी त्याचे मन त्याला खातच असते. त्यामुळे तो सतत भयकंपीत असतो. भयगंडाने पछाडलेला असतो. भाजपात शेकडो नेते आहेत. देशभरात भाजपाचे अनेक मातब्बर नेते आहेत. कर्नाटकातील मतदारसंघात मतांचा कसा घोटाळा झाला ? हे राहूल गांधींनी उघड करून दाखवले. त्यावर कर्नाटकातील भाजपाचा कुणी नेता बोलायला पुढे आला नाही, देशातला इतर कुणी नेता त्यावर बोलला नाही. भाजपचे अध्यक्ष चिडीचुप. मग देवेंद्र फडणवीसच का उतावळे झाले आहेत ? भाजपाचे प्रवक्ते बोलायच्या आधी हेच का बोलत आहेत ? राहूल गांधी निवडणूक आयोगावर बोलत असताना यांनी पातळी सोडून राहूल गांधींच्यावर का टिका केली ? त्यांचा तोल का सुटला ? याचा मानसशास्त्रीयदृष्टीने विचार करावा लागेल. कारण त्यांना त्यांनी केलेल्या व दडपलेल्या पापाची भिती वाटते आहे म्हणूनच ते राहूल गांधींच्या डोक्यातली चीप तपासायला गेले. फडणवीस जर गुन्हेगार नसते तर ते फडफडले नसते. फडणवीस ना निवडणूक आयोगाचे पदाधिकारी आहेत, ना प्रवक्ते. मग फडणवीस आणि त्यांची पिलावळ का अस्वस्थ होतेय ? निवडणूक आयोगाने उत्तर देणे गरजेचे असताना हे का बोलत आहेत ?

विधानसभा निवडणूकीआधी लाडकी बहिण योजना घोषीत केली गेली होती. मागच्या रक्षाबंधनला सदर योजनेची शिंदे सरकारने अंमलबजावनी केली. त्यानंतर विधानसभा निवडणूकीत प्रचार करताना फडणवीस जाहिरपणे म्हणायचे, "आमच्यासोबत लाडक्या बहिणी आहेत. त्यांची सत्तर लाख मते आम्हला पडणार आहेत. त्यामुळे आमचीच सत्ता येणार ! असे फडणवीस ठासून सांगत होते. विधानसभा प्रचारातली फडणवीसांची भाषण काढली तर हे लक्षात येईल. फडणवीस मतांचा जो आकडा सांगून सत्तेत येण्याची हमी देत होते तो मतांचा आकडा आणि मतदार यादीतल्या वाढीव मतांचा व घोटाळा झालेल्या मतांचा आकडा जवळपास सारखाच असल्याचे राहूल गांधी यांच्या आरोपातून स्पष्ट होत आहे. फडणवीसांनी हा झोल नक्कीच केला असावा म्हणूनच ते बिथरले आहेत. म्हणूनच त्यांच्या पायाखालची वाळू घसरली आहे. स्वतःला खुपच चाणाक्ष समजणा-या फडणवीसांना राहूल गांधींच्या बॉंबगोळ्याने धडकी भरली असावी. आपल्याकडे कुणी बोट दाखवू नये या भितीने आधीच कांगावा करण्यास त्यांनी सुरूवात केली आहे. फडणवीस यांच्या बुडात दम आहे तर त्यांनी राहूल गांधींना कोर्टात खेचावे. न्यायालयात याचिका दाखल करावी. राहूल गांधी खोटे आहेत, लबाड आहेत किंवा डोक्यातली चीप हरवलेले येडे आहेत तर त्यांना अटक करावी. राज्यात व केंद्रात फडणवीसांच्या पक्षाचीच सत्ता आहे. फडणवीस तुमच्या हातात सत्ता आहे तर बाष्कळ बडबडण्यापेक्षा, पातळी सोडून टिका करण्यापेक्षा राहूल गांधींना कोर्टात खेचा. त्यांना अटक करा. होवून जाऊ द्या, "दुध का दुध और पाणी का पाणी."

## सोलापूर जिल्ह्यातील तयारीची माहिती निवडणूक आयोगाला सादर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मतदानाचा टक्का अधिकाधिक वाढण्यासाठी नियोजन करा, मतदान केंद्रावर आलेल्या मतदारांना जास्तीत जास्त मूलभूत सुविधा द्या, अशा सूचना राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी केल्या आहेत. पुणे विभागातील जिल्ह्यांची आढावा बैठक गुरुवारी पुण्यात झाली.

या बैठकीत सोलापूर जिल्ह्याच्या तयारीची माहिती प्रभारी जिल्हाधिकारी कुलदीप जंगम व महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सादर केली. सध्या जिल्हा परिषदेच्या प्रारूप प्रभाग रचनेच्या हरकतींची सुनावणी पूर्ण झाली आहे. विभागीय आयुक्त लवकरच अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध करणार आहेत.

महापालिकेची व नगरपरिषदांची प्रारूप प्रभाग रचना करण्याचे काम सध्या अंतिम टप्प्यात आले. जिल्ह्यातील जिल्हा परिषद, महापालिका, ११ नगरपरिषदा व एका नगरपंचायतीची निवडणूक होणार आहे. येत्या १८ ऑगस्ट रोजी जिल्ह्यातील ११ नगरपरिषदा व एका नगरपंचायतीची प्रारूप प्रभागरचना प्रसिद्ध केली जाणार आहे.

प्रारूप प्रभागरचनेसाठी केलेल्या कार्यवाहीची माहिती यावेळी देण्यात आली. मतदान केंद्रावर मतदारांना द्यायच्या सुविधा, पारदर्शक व लोकशाही पद्धतीने निवडणूका पार पाडण्यासाठी आवश्यक असलेली खबरदारी याबद्दल सूचना देण्यात आल्या आहेत. या बैठकीला पुणे महसूल विभागातील जिल्हाधिकारी व महापालिका आयुक्त उपस्थित होते.

निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी हेदेखील या आढावा बैठकीला उपस्थित होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी प्रारूप प्रभागरचनेची प्रक्रिया सध्या सुरू आहे. गट, गण व प्रभागाच्या आरक्षण सोडतीबाबत अद्यापपर्यंत आयोगाने सूचना दिलेल्या नाहीत. या प्रक्रियेकडे इच्छुकांचे आणि सर्वसामान्यांचे लक्ष लागले आहे.

## फडणवीस मराठा नेत्यांना संपविण्याच्या तयारीत

### भाजप आमदार - खासदारांचे फोन

**अहिल्यानगर (कटूसत्य वृत्त):-** भाजपमधील अनेक मराठा नेते मला फोन करून सांगतात की त्यांना त्रास दिला जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मराठा नेत्यांना संपविण्याच्या तयारीत आहेत. आतापर्यंत मला ३० ते ३२ आमदार व खासदारांचे फोन आले आहेत; असा धक्कादायक खुलासा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे.

मराठा आरक्षणासाठी पुन्हा एकदा मुंबई येथे २९ ऑगस्टला आंदोलन छेडण्यात आले आहे. या अनुषंगाने जरांगे पाटील हे ठिकठिकाणी जाऊन मराठा समाज बांधवांची भेट घेऊन संवाद साधत आहेत. यात अहिल्यानगर जिल्ह्यात दौऱ्यावर आले असता मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आज एक धक्कादायक दावा केला आहे. त्यांनी यापूर्वी देखील मुख्यमंत्री फडणवीस यांच्यावर निशाणा साधत आरोप केले आहेत.



**फडणवीसांनी पक्षाची दिशा बदलली :**

दरम्यान मनोज जरांगे पाटील म्हणाले, देवेंद्र फडणवीस मराठ्यांचे नेते आणि अधिकारी संपवण्याच्या कामाला लागले आहेत. प्रत्येक मंत्र्यांना फडणवीस यांनी स्वतःचे OSD दिले आहेत. भाजप पक्ष वेगळा होता, पण फडणवीस यांनी पक्षाची दिशा बदलली आहे. सत्तेसाठी त्यांनी नारायण राणे, अजित पवार, राधाकृष्ण विखे, अशोक चव्हाण यांसारख्या अनेक नेत्यांना पक्षात घेतले. एवढेच नव्हे तर भाजपमधीलच अनेक नेते संपवण्याचे कामही सुरू आहे.

**मराठा नेत्यांचा दररोज फोन**

तसेच सत्तेसाठी आपल्या लोकांना लाथा मारण्याचं काम सुरू आहे आणि माझ्याकडे त्याची यादी असल्याचा दावा देखील त्यांनी केला आहे. त्यांनी पुढे सांगितले की, जालन्यासह सोलापूर आणि नांदेड येथेही अनेक मराठा नेत्यांना त्रास दिला जात आहे. आमची परिस्थिती बिकट आहे असे सांगणारे नेते दररोज संपर्क साधत आहेत; असा दावा त्यांनी केला.

## स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी कामाला लागा - शशिकांत शिंदे

**मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):-** आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी लक्ष घालून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी जीवाचे रान करावे असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी व्यक्त केले.



प्रदेशाध्यक्ष पदावर नियुक्ती झाल्याबद्दल भैरवनाथ उद्योग समूहाचे अध्यक्ष अनिल सावंत यांच्या हस्ते कोरेगाव येथे शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रांतिक सदस्य राहुल शहा, शहराध्यक्ष चंद्रशेखर कोंडूभैरी, कार्याध्यक्ष संतोष रंदवे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रदेशाध्यक्ष शिंदे म्हणाले की, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत पक्षाला मतदारसंघात वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी पक्षाची भूमिका कार्यकर्त्यांना समजावून सांगण्याचे आवाहन केले. यावेळी उपाध्यक्ष अनिल सावंत त्यांच्याशी चर्चा केली.

## राज्यात पुढील चार दिवस वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** गेले काही दिवस विश्रांती घेतलेल्या पावसाने पुनः सुरुवात केली असून, पुढील चार ते पाच दिवस राज्यात वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस होण्याची शक्यता वर्तवली आहे. विशेषतः कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडा भागात पावसाचा जोर अधिक राहण्याची शक्यता आहे. अरबी समुद्रापासून हिमालयाच्या



पायथ्यापर्यंत पसरलेला वारा व दबावपट्टा आणि तामिळनाडू किनाऱ्याजवळील चक्राकार वारा या दोन्ही गोष्टी राज्यातील हवामानाला पूरक हवा पुरवणार असल्याने मोसमी पावसाळा दमदार सुरुवात होणार आहे.

**मुसळधार पाऊस कोठे होणार ?**

कोकणातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, तसेच पुणे, सातारा, कोल्हापूर या भागात मुसळधार पावसाचा इशारा आहे. मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातही काही ठिकाणी वीज आणि वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवली आहे. हलक्या पावसामुळे काही प्रमाणात थंडावा जाणवेल, पण कोकणाप्रमाणे इतर प्रदेशात उकाड्यामुळे तापमान अजूनही वाढलेलं आहे काही ठिकाणी तापमान ३५त्उ पर्यंत पोहोचलेल्या नोंदी आहेत. हलक्यापावसाने वातावरणात बदल अपेक्षित आहेत.

**प्रशासनाने दिल्या सूचना -**

नदीच्या कडेला राहणाऱ्या नागरिकांनी काळजी घ्यावी. कोकण किनाऱ्यावर वाऱ्यांमुळे मच्छिमारांनी समुद्रात जाणे टाळावे. विजांसह पावसानंतर झाडांच्या खाली थांबणे पूर्णपणे टाळावे. घराबाहेर निघण्याच्या आधी पावसाचा अंदाज घेऊनच बाहेर पडण्याचा निर्णय घ्यावा.










# श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य दिंडी सोहळ्याचे आयोजन : अतुल पाटील



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** नातेपुते नगरपंचायत नातेपुते ग्रामस्थ तसेच नातेपुते नगरीतील सर्व वारकरी संप्रदाय आणि भजनी मंडळ व नातेपुते शहरातील शाळेतील विद्यार्थी, शिक्षक यांच्या संयुक्त विद्यमाने नातेपुते नगरीत केवल्य सम्राट संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जयंतीनिमित्त शुक्रवार दिनांक १५ ऑगस्ट रोजी श्रावण वध सप्तमी श्रीकृष्ण जयंती दिवशी दुपारी ३ ते ७ या वेळेत साजरी करण्याचे आयोजन केले असल्याची माहिती नातेपुते नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष अतुल पाटील यांनी घेण्यात आलेल्या नियोजन बैठकीमध्ये दिली. तसेच थोडे माहिती देत असताना त्यांनी सांगितले की, दुपारी २ वाजता श्रीकृष्ण मंदिर बोराडे वस्ती येथे भगवान श्रीकृष्ण यांची आरती होऊन माऊलीच्या पादुका रथात विराजमान झाल्यानंतर दुपारी ३ वाजता पादुकाचे माऊली मंदिर पालखी मैदान येथे आगमन दुपारी ३ वाजून १५ मिनिटांनी पालखी मैदान येथील माऊली मंदिरात माऊलींना अभिषेक दुपारी ३ : ३० वाजता माऊली मंदिर येथून दिंडीचे प्रस्थान या दिंडीमध्ये नातेपुते येथील ग्रामस्थ सर्व वारकरी संप्रदाय आणि भजनी मंडळ तसेच शाळा व महाविद्यालय येथील विद्यार्थी व शिक्षक वारकऱ्यांच्या वेशभूशेमध्ये सहभागी असणार आहेत दिंडीचा मार्ग माऊली मंदिर ते पालखी मैदान पिरळे चौक - अण्णाभाऊ साठे चौक - डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक - मुख्य पेटीतून नातेपुते नगरपंचायत - श्री महादेव मंदिर - श्री विठ्ठल मंदिर - श्रीराम मंदिर - श्री खंडोबा मंदिर अशा प्रकारे दिंडी मार्गक्रम होणार आहे. दिंडीची सांगता सायंकाळी ७ वाजता कवितके सांस्कृतिक भवन येथे होणार आहे. तरी नातेपुते मधील सर्व माऊली भाविक भक्तांनी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज दिंडी सोहळ्यामध्ये मोठ्या संख्येने सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन नातेपुते नगरपंचायतीच्या वतीने करण्यात आले आहे. यावेळी नगराध्यक्षा अनिता लांडगे, उपनगराध्यक्ष अतुल पाटील, संदीप ठोंबरे, नंदकुमार लांडगे, अशोक जावरे, प्रदीप वनसाळे, विकास पांढरे व नातेपुते येथील शाळेचे शिक्षक प्रतिनिधी उपस्थित होते. तसेच नातेपुते शाळेतील शिक्षक प्रतिनिधी उपस्थित होते.

# श्रावणी सूर्यवंशी ची राष्ट्रीय स्पर्धेत ३ सुवर्ण पदकासह हॅट्रिक



**बेंगलोर (कटूसत्य वृत्त):-** दि. ४ ते ८ ऑगस्ट २०२५ दरम्यान बेंगलोर येथील केन्सिंगटन स्विमिंग पूल येथे पार पडलेल्या ४१ व्या सब ज्युनियर आणि ५१ व्या ज्युनियर नेशनल अक्वाटिक्स चैम्पियनशिप २०२५ या राष्ट्रीय स्पर्धेत, सोलापूरच्या श्रावणी प्रताप सूर्यवंशी हीने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करताना डायविंग या क्रीडा प्रकारात १९ वर्षे वयोगटात खेळताना तीन सुवर्ण पदकासह हॅट्रीक साधली आहे.

श्रावणी ही देगांव येथील स्व.मीनाताई ठाकरे (माँसाहेब) क्रिडा व शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय देगांव, सोलापूरची विद्यार्थिनी असून ती इयत्ता १२ वी शास्त्र शाखेत शिकत आहे. या स्पर्धेत श्रावणी ने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले असून

दि. ६ ऑगस्ट रोजी डायव्हींग मधील हायबोर्ड मध्ये खेळताना २८८.०५ गुणासह श्रावणीने गोल्ड मेडल पटकावले. दि. ७ ऑगस्ट रोजी झालेल्या 3 मीटर स्प्रींग बोर्ड मध्ये खेळताना ३१३.३० गुणासह दुस-या सुवर्ण पदकावर नांव कोरले आहे. याच क्रीडा प्रकारातील 1 मीटर स्प्रीग बोर्ड ची स्पर्धा दि.८ ऑगस्ट रोजी पार पडली असून, यामध्ये श्रावणी ही २६८.१५ गुणासह तिस-या सुवर्ण पदकाची मानकरी ठरली.

या राष्ट्रीय डायव्हींग स्पर्धेत देशातील महाराष्ट्र, तमिळनाडू, मध्यप्रदेश, कर्नाटक, पश्चिम बंगाल, मणिपूर, गुजरात इत्यादी राज्यातील व एसएसईबी च्या मुलीनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेत महाराष्ट्राला ११ गोल्ड, ५ सिल्वर, ७ ब्राँज, असे एकुण २३ पदके मिळाली. यामध्ये सोलापूरच्या एकटया श्रीवणी सुर्यवंशी ने 3 गोल्ड मेडल मिळवत हॅट्रीक साधत मोलाचा वाटा उचलला.

श्रावणीने आजवर डायव्हींग क्रीडा प्रकारामध्ये शालेय आणि फेडरेशन च्या वतीने घेतल्या गेलेल्या स्पर्धेत -

राज्य पातळीवर २२ गोल्ड, ६ सिल्वर, १ ब्राँझ

राष्ट्रीय पातळीवर १५ गोल्ड, ५ सिल्वर, २ ब्राँझ,

आतंरराष्ट्रीय २ गोल्ड, ४ सिल्वर, २ ब्राँझ

याप्रमाणे तिने एकूण ५९ पदके वयाच्या अवघ्या १७ व्या वर्षात आपल्या नावांवर केली आहेत. यासाठी तिला, तिचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे कोच श्रीकांत शेटे, कुंजकिशोर मेलेम, अतुल पाटील सरांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत आहे विशेष सोलापूर जिल्हा इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक गणेश सोनटक्के साहेब यांनी श्रावणीच्या यशाचे कौतुक करीत तिला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या दरम्यान स्व.सौ.मीनाताई ठाकरे (माँसाहेब) क्रिडा व शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय देगांव, संस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय वानकर, विश्वस्त विठ्ठल वानकर, प्राचार्य खांडेकर आर वी क्रीडाशिक्षक बेलुरे तसेच सर्व शिक्षकवृंद व कर्मचारीवृंद यांनी श्रावणीचे यश अभिमानास्पद असल्याच्या भावना व्यक्त केल्या आहेत.

# सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाच्या वतीने ग्रंथालय कार्यशाळा



**कोर्टी (कटूसत्य वृत्त):-** शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक योजना राबविण्यात येतात. ग्रंथालयांनी या योजनांचा लाभ घेण्यासाठी सतत अद्ययावत राहिले पाहिजे.

त्यातून अधिक चांगल्या सेवा सुविधा देत वाचक भीमूक होता येईल असे प्रतिपादन ग्रंथमित्र जिल्हा ग्रंथालय संघाचे मार्गदर्शक कुंडलिक मोरे यांनी केले. सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघ यांच्या वतीने ज्ञानेश्र्वर वाचन मंदिर, करमाळा जि. सोलापूर येथील सभागृहात एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. प्रथमता कुंडलिक मोरे व जिल्हा ग्रंथालय संघाच्या लिपिक वृषाली हजारे यांच्या हस्ते थोर समाजसेवक राजा राममोहन रॉय यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात

आले.प्रास्ताविक राजीव गांधी सार्वजनिक वाचनालय, रावगावचे सचिव भास्कर पवार यांनी केले.

मोरे यांनी राजा राममोहन राय फाउंडेशन, कोलकत्ता यांच्याकडून देण्यात येणाऱ्या समान असमान निधी संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले. यामध्ये प्रामुख्याने ग्रंथालयांसाठी नवीन इमारत बांधकाम करणे,जुनी इमारत विस्तारीकरण करणे,चिल्ड्रन कॉर्नर, ग्रंथ व फर्निचर निधी, फिरते ग्रंथालय, मोबाईल व्हॅन, ग्रंथालय परिसंवाद व ग्रंथ प्रदर्शन, संगणक संच, तसेच ५०/७५/१००/१२५ वर्ष पूर्ण झालेल्या ग्रंथालयांना विशेष निधी, दिव्यांग वाचकांना सुविधा, ज्ञान कोपरा तयार करणे, स्वच्छ भारत अभियान इत्यादी योजना, सेवा सुविधा संदर्भात सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.जिल्हा ग्रंथालय संघाच्या लिपिक वृषाली हजारे यांनी एनजीओ पोर्टल याविषयी लागणारे दस्तऐवज व आरआरआरएलएफ यांच्या लिंक वर जाऊन प्रत्येकाने वाचनालय रजिस्टर करून घेण्याचे आवाहन केले.यामुळे या कोणत्याही फाउंडेशनचा लाभ स्वरूपाचा घेण्यास सोयीस्कर जाणार आहे.

# पुण्यात पुन्हा हुंडाबळी; सासरच्या जाचास कंटाळून नवविवाहीतेची आत्महत्या



**पुणे (कटूसत्य वृत्त):-** वैष्णवी हगवणे हुंडाबळी प्रकरणानंतर शहरात पुन्हा एकदा हुंडाबळीची धक्कादायक घटना घडली आहे. आंबेगाव येथील राहत्या घरी, दिनांक ९ ऑगस्ट २०२५ रोजी स्नेहा सावंत-झेंडगे (मूळ रा. कर्देहळी, ता. दक्षिण सोलापूर) हिचा मृतदेह आढळून आला. हि आत्महत्या नसून नियोजित कटातून करण्यात आलेली हत्या असल्याचा आरोप मृत युवतीच्या माहेरच्यांनी केला आहे.

स्नेहा झेंडगे हिचा मे २०२४ मध्ये विशाल संजय झेंडगे (मूळ गावः भांबेवाडी, ता. मोहोळ, जि. सोलापूर) याच्याशी विवाह झाला होता. लग्नावेळी सर्व मानपान व स्त्रीधन दिले असूनही सासरकडून ५० लाख रुपयांची मागणी करत स्नेहाचा सतत मानसिक, आर्थिक आणि शारीरिक छळ सुरू होता असे माहेरच्यांचे म्हणणे आहे.

कौटुंबिक हिंसाचार आणि छळाबाबत स्नेहाने यापूर्वी वालसंग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. मात्र, सासरच्या लोकांनी दबाव निर्माण करून ही तक्रार मागे घेण्यास भाग पाडल्याचे स्नेहाच्या आईवडिलांचे म्हणणे आहे.

तक्रार मागे घेतल्यानंतर सासरकडून पैशांसाठी पुन्हा स्नेहाचा छळ होऊ लागला. अखेर ९ ऑगस्ट रोजी राहत्या घरात स्नेहाचा मृतदेह आढळून आला. या प्रकरणी भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन अंतर्गत नवरा विशाल झेंडगे, सासरे संजय झेंडगे आणि सासू विठाबाई झेंडगे यांना अटक करण्यात आली आहे. सदर प्रकरणात हत्या, हुंडाबळी, मानसिक व शारीरिक छळ, तसेच हुंडा प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

या घटनेने खळबळ उडाली असून समाजातील हुंडाप्रथा किती खोलवर रुजली आहे याचीच प्रचिती पुन्हा आली आहे. या प्रकरणाचा सखोल तपास व्हावा व दोषींवर तत्काळ कारवाई व्हावी अशी मागणी स्वाभिमानी ब्रिगेड संघटनेचे अध्यक्ष रोहन सुरवसे पाटील यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पुणे शहर पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. ह्लपैशाच्या लोभापायी मुलींचा जीव घेणाऱ्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे; अन्यथा आम्ही रस्त्यावर उतरून आक्रमक भूमिका घेऊ,ह्व असा इशाराही सुरवसे पाटील यांनी दिला आहे.

# रेणुका पतसंस्थेची ४० कोटीने उलाढालीत वाढ, १२ टक्के लाभांश जाहीर : बाबाराजे देशमुख



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** व्यापारी वर्गांना व्यापारी पेठेत अनेकांना पैसे लागतात. खातेदारांना मागेल तेवढी रक्कम द्यावी लागते. ९० टक्के खातेदार चांगले तर १० टक्के खातेदारांच्या अडचणी असतात. पतसंस्थेविषयी निष्ठा असणारी प्रामाणिक कर्मचारी, संचालक मंडळ संस्थेमध्ये असल्याने रेणुका पतसंस्थेची ४० कोटीने उलाढालीत वाढ झाली असल्याचे प्रतिपादन सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व रेणुका पतसंस्थेचे चेअरमन बाबाराजे देशमुख यांनी व्यक्त करून सभासदांना १२ टक्के लाभांश जाहीर केला. ते रेणुका पतसंस्था, रेणुका महिला पतसंस्था, हर हर महादेव पतसंस्था तसेच समाज भूषण नानासाहेब देशमुख विकास सोसायटीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये बोलत होते. यावेळी माजी आमदार अँड. रामहरी रुपनवर, सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख, रेणुका महिला पतसंस्थेच्या चेअरमन सुचित्रादेवी देशमुख, संचालिका श्रुतिका देशमुख, अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती मामासाहेब पांढरे, शिवप्रसाद अर्बनच्या चेअरमन ऋतुजा मोरे, नगराध्यक्षा अनिता लांडगे, मा.उपनगराध्यक्ष मालोजीराजे देशमुख, अँड. बी.वाय.राऊत, माळशिरस पंचायत समितीचे सदस्य माऊली पाटील, धैर्यशील देशमुख अमरशिल देशमुख राजाभाऊ देशमुख डॉ.एम.पी.मोरे, महेश शेट,उद्योजक अतुल बावकर,विलास काळे, संतोष काळे, राजेश चंकेश्वरा, वामन पलंगे डॉ.प्रशांत गांधी, बाहुबली चकेश्वरा, अमोल उराडे, एन.के. साळवे, युवराज वाघमारे, सतिश सपकाळ, सुवर्णा पांढरे, मिनल कुलकर्णी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. रेणुका पतसंस्थेचे अहवाल वाचन नारायण बोराटे, रेणुका महिला पतसंस्थेचे अहवाल वाचन अशोक करचे, हर हर महादेव पतसंस्थेचे अहवाल वाचन उमेश पोतदार, समाजभूषण नानासाहेब देशमुख विकास सोसायटीचे अहवाल वाचन बापूराव पाटील यांनी केले. सभेच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मालोजीराजे देशमुख यांनी केले असून आभार सुवर्णा पांढरे यांनी मानले सर्वसाधारण सभेसाठी नातेपुते येथील पतसंस्थेचे चेअरमन व्यापारी वर्ग सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित सर्वांसाठी भोजन व्यवस्था करण्यात आली होती.

> पतसंस्था काढता येतात परंतु चालवणे अवघड आहे. सिस्टीम समजून घेतली पाहिजे तालुक्यामध्ये पतसंस्थेची वाईट परिस्थिती आहे. भान ठेवून निर्णय घेणे गरजेचे
>
> **- अँड रामहरी रूपनवर,** (माजी आमदार)
>
> गोरगरीब जनतेच्या व्यवसायाला आर्थिक पाठबळ मिळावे म्हणून कै.नानासाहेब देशमुख यांनी रेणुका पतसंस्थेची स्थापना १४ जानेवारी १९८६ साली केली. पतसंस्थेमुळे अनेकांचे व्यवसाय उभारले सुरुवातीला ५०९ सभासदावर सुरू केलेली पतसंस्था आज ११२८ सभासद आहेत. पतसंस्थेची प्रगतीची वाटचाल असून भाग भांडवल २ कोटी ३८ लाख, ठेवी ४८ कोटी ९ लाख, गुंतवणूक १७ कोटी ५७ लाख , नफा ४० लाख.
>
> **- मालोजीराजे देशमुख**
> (मा. उपनगराध्यक्ष तथा रेणुका पतसंस्था संचालक)

# राजराजेश्वरी संगीत विद्यालयाचा वर्धापन दिन उत्साहात



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नीलम नगर येथील नेताजी शिक्षण संकुलातील राजराजेश्वरी संगीत विद्यालयाचा सातवा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

संस्थाध्यक्ष अण्णाराव कुंभार यांच्या मार्गदर्शनखाली, प्राचार्य रविशंकर कुंभार, प्रमुख अतिथी ज्येष्ठ संगीत साधक श्याम नाईकनवरे, सेवानिवृत्त प्राचार्य विजयकुमार हुल्ले, संगीत विद्यालयाचे संचालक प्रवीण कुंभार, तबला विशारद ऋतुराज सोनवणे, संगीत विद्यालय समन्वयक विश्वाराध्य मठपती, ज्येष्ठ शिक्षक शिवकुमार शिरुर, हणमंत कुरे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.

प्रथम श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी व तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या प्रतिमेचे पूजन तसेच वाद्यवृंदाचे पूजन करण्यात आले. त्यानंतर संगीत विद्यालयातील विद्यार्थी अपर्णा तुम्मा, लहरीका गोने, शिवराज घंटे, रक्षिता सुंकनपल्ली, आलेक्या कोंतम, शाश्वत मठपती, वैष्णवी घंटे, पूर्वा रेके, शुभम तट्टे, जान्हवी कांबळे, स्वराली रॅका, हेमा जुंजा, प्रचिता श्रावण, भक्ती पुजारी, भक्ती कुंभार, आराध्या जमादार आदींनी भूपाळी, दुर्गा, काफी, यमन, खमाज, भैरवी या रागातील बंदीश तसेच ओंकार प्रधान रुप गणेशाचे, देहाची तिजोरी, पायो जी मैंने राम रतन धन पायो, पाऊले चालती पंढरीची वाट, कभी राम बनके कभी श्याम बनके, लकडी की काठी, अशी चिकमोत्याची माळ, तुम्ही हो माता पिता तुम्ही हो ही आदी विविध गीते सादर करून उपस्थित रसिकांची मने जिंकली.


तबला विभागातील गणेश चपळगाव, भरत गडगी, सिद्धार्थ नल्ला या विद्यार्थ्यांनी तीन ताल कायदा आणि रेला यांची अप्रतिम कला सादर केले. मान्यवरांनी सर्व विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले.

# मंगळवारी कृषी औजारे व साहित्याची निवड लॉटरी पध्दतीने

**सोलापूर,(कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषद सोलापूर कृषी विभाग यांचे मार्फत जि.प.सेस फंडातुन पिक संरक्षण औजारे/उपकरणे (श्री पिस्टन स्प्रे पंप, पॉवर स्प्रेपंप, नॅपसॅक बेटरी ऑपरेटेड स्प्रेपंप, ब्रश कटर, सोलार इन्सॅक्ट ट्रॅप), ट्रॅक्टर चलित औजारे ( रोटाव्हेटर, पल्टी नांगर, रोटरी टिलर/विडर, पेरणी यंत्र), कृषि सिंचनासाठी सुधारित औजारे साधने पुरविणे. (5 एच पी सबमर्सिबल विद्युत पंपसंच, डिझेल इंजिन) कृषि सिंचनासाठी सुधारित औजारे साधने पुरविणे कडबाकुटटी, ताडपत्री, मधुमक्षीका पेटी (25%), स्लरी फिल्टर) सेंद्रीय शेती (हिरवळीचे खतबियाणे, ताग, धेचा, गांडूळ, कल्चर व बेड) 50% मर्यादित अनुदानावर ऊ्ह्ळ तत्त्वावर देण्यात येणार आहेत. वरील औजारासाठी शेतकऱ्यांना पंचायत समिती स्तरावर अर्ज करण्यासाठी दि.30 जून 2025 पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली होती. सदर योजनेकरिता तालुकानिहाय एकुण उदिष्ट 2 हजार 459 असुन प्राप्त अजार्ची संख्या 21 हजार 554 इतकी आहे.

मंगळवार, दि. 12 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 10 वाजता मुख्य कार्यकारी अधिकारी, व अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. सोलापूर यांचे उपस्थितीत औजारासाठी बाबनिहाय लक्षांकानुसार लॉटरी पध्दतीने शाळकरी मुलांकडून लाभार्थ्यांची निवड चिट्टी काढण्यात येणार आहे. यावेळी शेतक-यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. सोलापूर व कृषी विकास अधिकारी जि.प. सोलापूर यांनी केले आहे.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) राष्ट्रवादीचे नाशिक जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते २) महाराष्ट्रातील एक जिल्हा, या जिल्ह्यातून गोदावरी नदी वाहते ३) माकड ४) स्वभावाने रागीट ५) क्रिकेटमधील फलंदाजाच्या हातातील लाकडी फळी (इंग्रजीत) ६) मिरच्या व गरम मसाला वापरून बनविलेले तिखट ९) जुनाच्या विरूध्दार्थी शब्द १२) गुटर घुं करणारा पक्षी १३) आर्थिक व्यवहारात केलेला घोटाळा १५) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत) १७) उत्तरप्रदेश संक्षिप्तमध्ये असे लिहितात-** १९) घर (हिंदीत) २०) तिखट न टाकता डाळीचे बनविलेले कालवण २१) मनसे अध्यक्ष-** ठाकरे २३) फसवणूक करणारा २५) झुणका बनविण्यासाठी केलेले डाळीचे पीठ-*** पीठ २७) आवकच्या विरूध्दार्थी २८) रोख ३०) स्वत:वरील विश्वास, सचिन पिळगावकरचा एक चित्रपट ३२) दैत्य, राक्षस ३४) पुष्कळ, भरपूर ३५) धातूचा बारीक तंतू ३६) अध्ययन, रिडिंग (मराठीत) ३७) लिंबूपाण्याचे पेय ३३) सूर्य ३९) गंध, परीमळ ४१) मुंबईतील प्रमुख रेल्वे स्टेशन ४३) एक दुग्ध पेय ४५) सहा गुणिले दोन

**आडवे शब्द :** १) यात्रेनिमित्त देवाची वाजतगाजत काढलेली मिरवणूक ३) पश्चिम बंगालच्या महिला मुख्यमंत्री ७) खा. अमोल कोल्हे यांचा लोकसभा मतदारसंघ ८) वर्गातील मुलांची एकूण संख्या ९) बोल्टचा जोडीदार, अभिनेता १०) जवळ, समीप ११) कपडे वा मौल्यवान वस्तू ठेवण्याची मोठी पेटी १३) पायात चप्पल न घालता चालणे १४) हॉटेलमधील नोकर १५) खडबडीत (इंग्रजीत) १६) सीताहरण प्रसंगी रावणाशी लढा देणारा मोठा पक्षी १८) एक सद्गुरू-***** पै २२) धान्याचे केलेले बारीक चूर्ण २४) पटाईत, पारंगत २६) शिवसेनेचे मुंबईतील एक नेते-**** किर्तीकर २९) कोकणात आढळणारे वरून काटेरी पण आत गोड गरे असणारे मोठे फळ ३०) चार दुणे ३१) तमाशातील नाट्यप्रकार ३२) दरवाजा ३३) फायदा, लाभ ३५) शक्तीमान, ताकद असलेला ३८) शासकीय कार्यालयीन सुट्टीचा वार ४०) स्वादिष्ट, रूचकर ४२) एकमेकाबद्दल असलेली खात्री, हमी ४३) एक म्हण-*** तोंडी मोठा घास ४४) शब्दाला असलेले वजन, दरारा ४६) दोरी ४७) श्रीरामाचा एक बंधू, कैकयी पुत्र

## सुडोकु - 23

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2 | 8 | | 1 | 3 | 4 | 9 |
| 8 | | | | 7 | 3 | 2 | 5 | |
| | | 4 | | | | 8 | 7 | |
| | 9 | 7 | | | | 1 | 3 | 2 |
| 1 | | | | 3 | | | | |
| 5 | 8 | 3 | | 1 | 9 | | | |
| 9 | | | 5 | 6 | | | | 7 |
| 6 | 7 | 8 | 3 | | | 9 | 1 | |
| | | | | | | | 8 | 3 |

# वर्गणीसाठी धर्मादाय कार्यालयाची परवानगी गरजेची

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अंतर्गत कलम ४१-क नुसार कोणतीही नोंदणी नसलेली व्यक्ती अथवा संस्था धार्मिक किंवा धर्मादाय हेतूसाठी वर्गणी, देणगी अथवा मालमत्ता गोळा करत असल्यास, त्यांनी त्या वसुलीबाबत तात्काळ धमार्दाय आयुक्तांना कळविणे व परवानगी घेणे बंधनकारक असल्याचे सोलापूर विभागाचे धमार्दाय उप आयुक्त ईश्वर सुर्यवंशी यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळवले आहे.

गणेश मंडळांनी धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या परवानगीशिवाय वर्गणी गोळा केल्यास मंडळातील सदस्य कायदेशीर कार्यवाहीस पात्र असून, सदर कायदा नियमांचे उल्लंघन करणाऱ्यास द्रव्यदंड व तुरुंगवासाची शिक्षा तरतूद आहे.

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी वर्गणी किंवा देणगी गोळा करताना धमार्दाय आयुक्त कार्यालयाची पुर्वपरवानगी घेणे कायद्यानुसार बंधनकारक आहे. त्याकरीता त्यांनी धर्मादाय विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन जाऊन ऑनलाईन अर्ज सादर करुन परवानगी घ्यावी. अर्ज करण्याची प्रक्रिया सुलभ असून, http://chariy.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर त्याची सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

**परवानगीसाठी आवश्यक कागदपत्रे :**

- मंडळातील सदस्यांचे अधिकृत ओळखपत्र (आधार/पॅनकार्ड/ ड्रायव्हिंग लायसन्स/मतदान ओळखपत्र)
- जागेचा संमतीपत्र किंवा स्थानिक स्वराज संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र
- मंडळ स्थापनेचा ठराव
- मागील वर्षाचा खर्चाचा हिशोब
- रु.५०००/- पेक्षा जास्त जमा खर्च असल्यास लेखापरिक्षक अथवा सनदी लेखापालाचा अहवाल आवश्यक

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
**झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण**

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# मोहोळ नागरी पतसंस्थेची ४१ वी सर्वसाधारण सभा खेळीमेळीत संपन्न



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ नागरी सहकारी सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. त्यावेळी अध्यक्ष पाटील बोलत होते. पतसंस्थेच्या कामकाजात राजकारण येता कामा नये. त्याचा थेट परिणाम सभासदांवर होतो. मोहोळ नागरी पतसंस्थेच्या प्रगतीचा आलेख चढता आहे. गरजू व प्रामाणिक नागरिकांना मदत करण्याचे काम पतसंस्थेने केले आहे. मोहोळ नागरी पतसंस्थेने रिझर्व्ह बँकेच्या नियमांचे काटेकोर पालन केल्याचे प्रतिपादन राज्य सहकारी परिषदेचे अध्यक्ष राजन पाटील यांनी केले. पतसंस्थेचे अध्यक्ष डॉ.कौशिक गायकवाड म्हणाले, चालू वर्षी ठेवीत १२ कोटींची वाढ झाली आहे. तर नफ्यात १० टक्के वाढ झाली आहे. पतसंस्थेच्या ६ शाखांची वसुली शंभर टक्के झाली आहे. त्यामुळे त्या कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कर्मचाऱ्यांना १५ टक्के पगारवाढीची घोषणा डॉ. गायकवाड यांनी केली. यावेळी सभासद प्रसाद गुरव यांनी मृत सभासदांना देण्यात येणाऱ्या मदतीच्या रकमेत वाढ करण्याची सूचना केली. अंजनगाव (खे) येथील नवनाथ इंगळे यांनी पतसंस्थेची इमारत आमच्या गावात व्हावी, गावातील संचालकाला संधी द्यावी,तसेच कर्मचाऱ्यांना अग्रक्रम द्यावा अशा सूचना केल्या.यावेळी मोहोळ येथील सहायक निबंधक एस. टी. तेलंगरे, बाजीराव जोशी, सतीश मोहोळ नागरी सहकारी पत पुरवठा संस्था मर्यादित, मोहोळ वार्षिक सर्वसा भोसले, मारुती पाटील, प्रमोद डोके, जगु कोल्हाळ, शहाजी गुंड, हरिश्चंद्र चवरे, दिलीप पाटील, बाळासाहेब भोसले,बाळासाहेब पाटील आदींसह सभासद उपस्थित होते. आभार मोहोळ नागरी पत संस्थेचे मॅनेजर मुस्ताक शेख यांनी मानले.

# १६ वर्षाची सामाजिक बांधिलकी जपत १३,५०० गरजूंना नौकऱ्या दिल्या



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दि. ७ ऑगस्ट २०२५ रोजी करिअर पॉईंट प्लेसमेंट सर्व्हिसेस या संस्थेचा १६ वर्धापन दिन हॉटेल बालाजी सरोवर येथे उत्सहाने साजरा. कार्यक्रमाचे उदघाटन माननीय माजी आमदार राजनजी पाटील यांच्या हस्ते दीप प्रजलीत करून करण्यात आला. त्यानंतर संस्थेमधील गुणवंत कर्मचाऱ्यांना त्यांच्या हस्ते गौरवण्यात आले. त्याप्रसंगी त्यांनी संस्थेमधील कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन व पुढील वाटचालीस शुभेच्या दिल्या.या प्रसंगी संस्थेचे प्रमुख माननीय रमेश वायचळ यांनी संस्थेचा सोळा वष्यार्चा प्रवास कथित केला.

त्यावेळेस त्यांनी सांगितले २००९ रोजी संस्थेची सुरुवात केवळ २ कर्मचारी व १ क्लायंटनि १०० फूटयाच्या गाळ्यामधे केली होती. आज या संस्थेमध्ये ५० कर्मचारी संपूर्ण भारतातून कार्य करीत आहेत. संस्थेने आजपर्यंत १३५०० गरजूना संपूर्ण भारतभर विना मोबदला नौकऱ्या दिल्या आहेत.

त्यांच्या या कार्याबद्दल अनेक संस्थेने त्यांना गौरविलेले आहे खास करून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघानेही त्यांना मागील वर्षी गौरविलेले आहे. संस्थेस नुकताच ISO १०००२:२०१८ हे प्रतिस्थेचे मानांकन मिळाले आहे. संस्थेचा मानस आहे येणाऱ्या तीन महिन्यामध्ये परदेशात हि नौकऱ्या उपलबद्ध करून देणार आहे.

या नंतर शिव व्यख्याते माननीय शिवरत्न शेटे यांनी त्यांच्या अनोख्या संभाषण कौशयल्य मधून छत्रपती शिवाजी महाराज कसे मॅनेजमेण्ट गुरु होते. त्यांनी कसे सर्व प्रतिकूल परीस्तिमधे स्वराजाचे निर्माण केले. त्यांना आलेल्या प्रत्येक अडचणी व त्यांवर त्यांनी केलेली मात या विषयी सविस्तर कथन केले.या कार्यक्रमाचे सूत्र संचालन सुरज वर्मा यांनी केले. या प्रसंगी संस्थेचे व्यावसायिक भागीदार उमाकांत येलका, मोहसीन शेख, करिष्मा सैफन, परवीन मुल्ला, रोझिना सैय्यद, अमृता साळुंके व अभिषेक गंगारेड्डी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनिकेत दादास, हरीश पवार, सचिन नादरगी, राकेश चितारे व साक्षी वायचळ विशेष परिश्रम घेतले.

# नवनिर्वाचित कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांचा ईच्छा भगवंताची मित्र परिवाराच्या वतीने सत्कार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** इंदापूरचे आमदार दत्तात्रय भरणे कुटुंबाला कसलाही राजकीय वारसा नसताना शेतकऱ्याचा मुलगा ते राज्याचे कृषीमंत्री पुण्याचा बहुमान आमदार दत्तात्रय भरणे यांना मिळाला राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कट्टर समर्थक व विश्वासू आमदार म्हणून भरणे यांचे महाराष्ट्र राज्यांमध्ये ओळख आहे प्रामाणिकपणा, पक्षनिष्ठा त्यामुळेच नुकतेच दत्तात्रय भरणे यांच्याकडे राष्ट्रवादी कॉंग्रेस पाटीर्चे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कृषी मंत्रालयाची जबाबदारी दत्तात्रय भरणे यांच्यावर दिली.दत्तात्रय भरणे यांनी कृषी मंत्रालयाचा पदभार देखील स्वीकारला दरम्यान राष्ट्रवादी कॉंग्रेस पाटीर्चे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांनी ईच्छा भगवंताची मित्र परिवाराच्या वतीनं राज्याचे नवनिर्वाचित कृषिमंत्री नामदार दत्तात्रय भरणे यांचा इंदापूर येथील भरणेवाडी निवासस्थानी येथे दत्तात्रय भरणे यांची भेट घेऊन शाल पांघरून पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी निलेश कांबळे, संतोष गायकवाड, महादेव राठोड, आनंद गाडेकर, वसंत कांबळे आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलताना कृषिमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की मी शेतकरी कुटुंबातील साधे व्यक्तीमत्व म्हणून परिचित आहे भरणे कुटुंबाला कसलाही राजकारणातील घराण्याच्या आईचा वारसा नाही केवळ प्रामाणिकपणा व पक्षनिष्ठा यामुळे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्यावर कृषी मंत्रालयाची जबाबदारी दिली आहे निश्चितच येणाऱ्या काळामध्ये राज्यातील शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेणार आहे शेतकऱ्यांचा सन्मान शाश्वत शेती आणि ग्रामीण समृद्धी हे माझे मुख्य उद्दिष्ट राहील शासनाच्या प्रत्येक धोरणामध्ये शेतकऱ्यांचा आवाज पोहोचवण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करेन एका शेतकऱ्याच्या मुलाला कृषी मंत्री पदाचा मान उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दिल्याबद्दल मी कृतज्ञ आहे असे ते म्हणाले. दरम्यान यावेळी किसन जाधव यांनी दत्तात्रय भरणे यांच्या पुढील कारकीर्दीस शुभेच्छा दिल्या.

# ऋतुराज शिंदे ची सहाय्यक कृषी अधिकारी पदी निवड



**वाशिंबे (कटूसत्य वृत्त):-** ऋतुराज विजय शिंदे यांची कृषी विभाग महाराष्ट्र शासनात पुणे विभागातून कृषी सहाय्यक पदी निवड झाली आहे.त्यांचे प्राथमिक शिक्षण गावी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाशिंबे येथे झाले असून माध्यमिक शिक्षण D K विद्यालय कुंथलगिरी व उच्च माध्यमिक महात्मा गांधी कॉलेज कर्जत आणी पदवीधर शिक्षण महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्न कृषी महाविद्यालय मालदाड, संगमनेर येथे झाले. जिद्ध आणी चिकाटीच्या जोरावर त्याने खडतर परिश्रम घेत यश मिळवले आहे. त्यांच्या यशाचे ग्रामस्थ यांच्या कडून अभिनंदन करण्यात येत आहे.

# बाजार समितीत भाजीपाल्याचे लिलाव वजना प्रमाणे करण्यास सुरुवात

## जनसेवा संघटनेच्या मागणीला यश



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज बाजार समितीमध्ये भाजीपाल्याचे लिलाव हे वजनावर न होता कॅरेट प्रमाणे केले जात होते.याबाबत महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटना व सर्व शेतकऱ्यांचे वतीने, विविध मागण्यांचे निवेदन अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीला दिले होते.यामध्ये

बाजार समितीतील भाजीपाला लिलाव वजनाप्रमाणे झाला पाहिजे. भाजीपाला वजन करून विकल्यास शेतकऱ्यांना योग्य भाव मिळेल आणि खरेदीदारांचीही फसवणूक होण्याची शक्यता कमी होईल.

तसेच बाजार समितीत भाजीपाला लिलाव करताना वजनकाटा प्रमाणित असणे आवश्यक आहे. यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक होणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच शेतकऱ्यांचे पट्टीमध्ये कमिशन कपात करु नये अशी मागणी करण्यात आली होती.

त्याअनुषंगाने अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीने दिनांक 8/8/2025 पासुन भाजीपाला लिलाव वजनाप्रमाणे करण्यास सुरुवात केली आहे.यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने पिकविलेल्या मालाला योग्य भाव मिळणार आहे.यासाठी शेतकऱ्यांनी जनसेवा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ.धवलसिंह मोहिते -पाटील यांचे आभार मानले आहेत.

# मंत्री भरत शेठ गोगावले व मंत्री संजय शिरसाट यांच्या शुभहस्ते शिवसेनेच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन




**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** रोजगार हमी पणन फलोत्पादन मंत्री भरतशेठ गोगावले व सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट नुकतेच माळशिरस तालुक्याच्या दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी शिवसेना भवन येथे राजकुमार हिवरकर पाटील यांची सोलापूर जिल्हा प्रमुख ओबीसी पदी निवड झाल्याने नव्याने निर्माण केलेल्या कार्यालयाच्या नामफलकाचे अनावरण केले.यावेळी मंत्री भरतशेठ गोगावले यांनी शुभेच्छा देऊन हे कार्यालयातून उपमुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे यांना अभिप्रेत असे कामकाज इथून घडावं अशी इच्छा व्यक्त केली. शेतकरी, कामगार, युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी सरकारच्या सर्व सुविधा त्याचबरोबर आरोग्याच्या सुविधा पोहोचवण्याची जबाबदारी पार पाडावी, यावेळी माजी आ.राम सातपुते, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख चरणराज चवरे, तालुकाप्रमुख सतीश सपकाळ, राष्ट्रवादीचे रियाज शेख, भाजपचे मनोज जाधव, भाजपाचे तेजस गोरे, सुनील बनकर, विनोद रणदिवे, बादल सोरटे आदी उपस्थित होते.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त आयुष्यमान कार्ड शिबिर



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त प्रभाग क्रमांक 1 मधील नागरिकांसाठी मोफत आरोग्य उपचारासाठी आयुष्यमान भारत पंतप्रधान जन आरोग्य योजना ई श्रम कार्ड योजना शिबिराचे आयोजन करण्यात आले होते याचे उदघाटन समारंभ राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ पवार यांच्या शुभहस्ते व नगरसेवक अजित भाऊ गायकवाड RG कंपनीचे संस्थापक अध्यक्ष पिंटू आप्पा डावरे अमोल दादा वामने यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या उपक्रमाचे आयोजन राष्ट्रवादीचे शहर उपाध्यक्ष सुजित अवघडे यांनी केले होते.

याप्रसंगी तुषार जक्का, बसवराज कोळी, विजयानंद काळे, पवन थोरात, आनंद इंगळे, आप्पी रणसुरे दत्ता सोनवणे, सुरज कांबळे, बुद्धप्रकाश ननवरे, सांबाया हानमुला, शोभाताई सोनवणे, मंगल सोनकांबळे, वंदना कांबळे, नागेश भंडारे, रोहन डोळसे, पिंटू कांबळे, राजन निकाळजे, नागेश जिरगे, किशोर इंगळे, शरणू हजारे, अश्वदीप जानराव, विकास कदम, चैतन्य तूपसुंदर, सांचीत कांबळे आदी उपस्थित होते.

# 'पांडुरंग 'कडून पोळा सणासाठी ऊस बिल बँकेत वर्ग





**श्रीपूर (कटूसत्य वृत्त):-** कर्मयोगी स्व. सुधाकरपंत परिचारक यांच्या सामाजिक जाणिवेचा वारसा पुढे नेत, कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग – सहकारी साखर कारखान्याने पोळा सणानिमित्त गळीत हंगाम २०२४-२५ मध्ये गाळप झालेल्या उसास प्रति मे.टन ७५ रुपयेप्रमाणे ऊस बिल बँकेत वर्ग केले आहे. ही परंपरा आजही कारखाना व्यवस्थापन जतन करत असल्याची माहिती चेअरमन माजी आ. प्रशांत परिचारक यांनी दिली.

यावेळी व्हाईस चेअरमन कैलास खुळे, कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी, संचालक दिनकर मोरे, उमेश परिचारक, दिलीप चव्हाण, ज्ञानदेव ढोबळे, तानाजी वाघमोडे, बाळासाहेब यलमर, भगवान चौगुले, लक्ष्मण धनवडे, भास्कर कसगावडे, भैरू वाघमारे, गंगाराम विभुते, सुदाम मोरे, विजय जाधव, हनुमंत कदम, किसन सरवदे, दाजी पाटील, दिलीप गुरव, सीताराम शिंदे, शामराव साळुंखे, राणू पाटील आदी संचालक वअधिकारी उपस्थित होते. चेअरमन प्रशांत परिचारक पुढे म्हणाले, कारखाना स्थापनेपासून स्व. सुधाकरपंत परिचारक यांनी पोळा सणाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळावी या हेतूने ऊस बिल देण्याची परंपरा सुरू केली होती. आजही ती परंपरा जपत, शेतकऱ्यांना सणासाठी लागणारी रक्कम मिळावी म्हणून हे ऊस बिल देण्यात आले आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधा आणि उत्साहाचे वातावरण आहे. कार्यकारी संचालक डॉ. कुलकर्णी यांनी सांगितले की, गळीत हंगाम २०२४-२५ मध्ये गाळप केलेल्या उसासाठी आतापर्यंत प्रति मे.टन २ हजार ७०० रुपये इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे. त्यासोबतच पोळा सणासाठी प्रति मे.टन ७५ रुपये रक्कमही आता जमा करण्यात आली असून, ऊस उत्पादकांना एफ.आर.पी. पेक्षाही ज्यादा रक्कम अदा केली आहे.



आगामी गळीत हंगाम २०२५-२६ साठी कारखान्याकडे सुमारे १५ हजार हेक्टर ऊस क्षेत्राची नोंद असून, त्यातून १२ ते १४ लाख मे. टन ऊस उपलब्ध होण्याचा अंदाज आहे. सर्व उसाचे वेळेत गाळप होईल, यासाठी ऑफ सिझनची सर्व कामे पूर्ण केली आहेत.

**- डॉ. यशवंत कुलकर्णी,**
कार्यकारी संचालक

# पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिटयूट मधील कौशल्य विकास बोर्डाच्या इलेक्ट्रिकल सुपरवायझर, ऑटोमोबाईल मेकॅनिक कोर्सेसचे निकाल जाहीर



**सातारा (कटूसत्य वृत्त):-** माहे जून/जुलै २०२५ मध्ये झालेल्या महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ मुंबई (टरइरश्एळ) बोर्डा व्दारे घेण्यात आलेल्या पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिटयूट,सातारा मधील.

१) इलेक्ट्रिकल सुपरवायझर ऑन कन्स्ट्रक्शन साईट व २) ऑटोमोबाईल मेकॅनिक टेक्निशियन कोर्सेसच्या परिक्षांचे निकाल जाहीर झाले असून सविस्तर निकाल पुढीलप्रमाणे –

१) इलेक्ट्रिकल सुपरवायझर – सदर अभ्याक्रमांचा निकाल ९५% लागला असून उत्तीर्ण झालेले

– विदयार्थी पुढीलप्रमाणे १) विघ्नेश चव्हाण ८२% जकातवाडी (सातारा) ८८% कुंभारगांव (पाटण) २) श्रेया कदम – ३) सागर सपकाळ – ८२% बगेर्वाडी (कोरेगांव) ४) कामेश कदम – ८२% भुरकवडी (खटाव) ५) प्रथमेश सपकाळ – ८१.५% बगेर्वाडी (कोरेगांव) ६) रोहित काशिद – ८१% किवळ (कराड) ७) प्रणव वायदंडे – ८०.५% कृष्णानगर (सातारा) ८) शिवप्रसाद भडांगे– – ७९.५% उब्रज (कराड) ९) प्रतिक राजे – ७८.५% करंजे (सातारा) १०) संकेत चव्हाण – ७८% दहिवडी (माण) ११) निलेश पवार – ७७.५% बगेर्वाडी (कोरेगांव) १२) वैभव पवार – ७३% आरफळ (सातारा) १३) प्रणव कांबळे – ६८.५% पसरणी (वाई) १४) शहाबाज नालबंद – ६८% माचुतर (महाबळेश्वर) १५) ओमकार यादव ६७.५% पसरणी (वाई) १६) योगेश्वर चव्हाण – ६७% इंदोली (कराड) १७) अंकित ननावरे – ६६.५% सातारा १८) सिध्दू कांबळे – ६६% सातारा, १९) आयुष शिर्के ६६% पसरणी (वाई) २०) उमेश साळुंखे – ६६% बोरगांव (सातारा) २१) साहिल जाधव ६६.५% दहिवडी (माण) २२) ओमकार कट्टे – ६४% गोंदवले (माण) २३) सतिश बरकडे – ६४% खावली (सातारा) २४) रैय्यान अन्सारी – ६४% सातारा २५) रविराज बर्गे ६७.५% नांदगिरी (कोरेगांव) २६) अनिस घावडे – ६३.५% सातारा २७) रोहित कणसे ६३.५% पसरणी (वाई), २८) हर्षद कट्टे – ६३% गोंदवले (माण) २९) विराज कट्टे – ६३% गोंदवले (माण) ३०) धनराज जाधव– ६२.५% पुसेगांव (खटाव) ३१) ऋषिकेश शिंदे – ६२% कोपर्डे (सातारा) ३२) अशिश देवघरे – ६१.५% इंदवली (जावली), ३३) श्रीजय बोबडे – ५९% अनपटवाडी (कोरेगांव) ३४) निलेश निकम – ५६% भाडळे (कोरेगांव) ३५) वैभव गोळे – ५३% एकसर (वाई) ३६) प्रशांत सरगर – ५०% धुळदेव (माण).

२) ऑटोमोबाईल मेकॅनिक टेक्निशियन सदर अभ्यासक्रमांचा निकाल १००% लागला असून उत्तीर्ण झालेले विदयार्थी पुढीलप्रमाणे– १) तेजस लोहार – ८५% काशिळ (सातारा) २) आदित्य जाधव ड्ट ७८.५% अंधारवाडी (कराड) ३) रोहित यादव – ७६.५% अंधारवाडी (कराड) ४) संदिप साबळे – ६८.५% आरफळ (सातारा) ५) सादिक खान (सातारा) ६) समिर महाडीक – ६१.५% आरे (सातारा). – ६५% वरील विविध कोर्सेसच्या विद्यार्थ्यानी महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व परीक्षा मंडळाची मार्कशिट संस्थेमधून

ऑफिस वेळेत घेवून जावीत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष / संचालक प्रा. सुनिलकुमार गो. पाटील, प्राचार्य सुजित पाटील यांनी अभिनंदन केले सदरहू १) इलेक्ट्रिकल सुपरवायझर व २) ऑटोमोबाईल मेकनिक टेक्निशियन कोर्स जिल्हयामध्ये फक्त पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिटयूट, सातारा मध्येच सुरू असून सदर अभ्यासक्रमाला शैक्षणिक पात्रता १० वी / १२ वी पास/नापास तसेच

कॉलेजच्या विद्यार्थ्यानां प्रवेश घेता येतो त्याचप्रमाणे कामगार व कर्मचारी यानाही प्रवेश घेता येतो. सदर अभ्यासक्रमासाठी थेअरी व प्रॅक्टीकल मराठी माध्यमातून शिकवले जाते. प्रत्येक कोर्ससाठी स्वतंत्र प्रॅक्टीकल लॅब, स्वतंत्र थेअरी वर्ग उपलब्ध आहेत. तसेच विविध बोर्डाच्या परीक्षा होतात. विद्यार्थ्यांना येण्या जाण्यासाठी बस पासची सवलत असून प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतर विविध कंपन्यामध्ये प्लेसमेंट दिली जाते. माहिती पत्रक व प्रवेश फॉर्मची किंमत रू. १००/– असून मनिऑर्डरने रुपए १२०/– पाठवा.

प्राचार्य पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिटयूट, प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्ड जवळ, सातारा मो. ९८२२०९७०७१ ऑफिस वेळ सकाळी १० ते ६ वेळेत संपर्क साधावा.

# मनोज जरांगे यांनी केले जाधव कुटुंबियांचे सांत्वन



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** मराठा आरक्षणासाठी संघषार्ची हाक देणाऱ्या मनोज जरांगे -पाटील बुधवारी ज्येष्ठ मराठा समन्वयक आणि महापालिका परिवहन समितीचे माजी सभापती राजन जाधव यांच्या निवासस्थानी भेट देऊन जाधव कुटुंबीयांचे सांत्वन केले

जाधव यांच्या मातोश्री सगुणाबाई जाधव यांचे नुकतेच निधन झाले आहे. त्यांच्या अंत्यविधीसाठी जरांगे पाटील हे उपस्थित राहू शकले नव्हते मात्र बुधवारी सोलापूर दौऱ्यात त्यांनी धरमशी लाईन येथील जाधव यांच्या घरी भेट देऊन.

सगुणाबाईच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.यावेळी त्यांनी जाधव कुटुंबातील सदस्यांशी संवाद साधत त्यांची आस्थेने विचारपूस केली. या प्रसंगी अमोल शिंदे, माऊली पवार, शेखर जाधव, विक्रांत जाधव, अक्षय जाधव, श्रीधर काळे, सचिन साळुंखे यांच्यासह जाधव कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

## जाहीर प्रसिध्दीकरण

**दि.कि.अर्ज क्र: ६५२/२०२५ नि.६**

**सोलापुर येथील मा.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ट स्तर मा.श्रीमती.ए.एस.जाधव सो. यांच्या न्यायालयात**

१. श्रीमती सईदा उर्फ साईदा अख्तर मोहमद इसाक शेख
वय – ५४ वर्षे, धंदा शिक्षक
२. चि. मोहम्मद साद म. इसाक शेख (अपाक)
वय ०९ वर्षे, धंदा शिक्षण
दोघेही रा. ब्लॉक नंबर ६२, निर्मिती विहार, इंद्रा नगर, विजापूर रोड, सोलापूर ४१३००४ **}अर्जदार**

**विरुद्ध**
कोणी नाही **}सामनेवाला**

ज्या अथी, अर्जदार यांनी सदरचा अर्ज वारसा दाखला मिळणेकरिता दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. हे मयत श्री. मोहमद इसाक कासिम शेख यांची पत्नी आहे आणि अर्जदार क्र.२ हा त्यांच्या मुलगा आहे. मयत श्री. मोहमद इसाक कासिम शेख हे सोलापूर येथे दिनांक ०२/०९/२०२४ रोजी निधन झाले आहेत. मयत श्री. मोहमद इसाक कासिम शेख यांच्या मृत्यु पश्चात अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारसदार आहे. मयत श्री. मोहमद इसाक कासिम शेख यांचे नावाने सोलापूर येथील येथील निर्मिती विहार जवळील लोखंडवाला बिल्डिंगमध्ये दोन गाळे i) मेसर्स लोखंडवाला बिल्डिंग जुना सिटी सर्वे क्र. ३६४/अ/१/२ नवीन सिटी सर्वे क्र. ३१/अ/१/२ बिल्डिंग A मधील गाळा क्र. ४Aएकूण क्षेत्र २६.९६ स्वे. फुट ii) मेसर्स लोखंडवाला बिल्डिंग जुना सिटी सर्वे क्र. ३६४/अ /१/२ नवीन सिटी सर्वे क्र. ३१/अ /१/२ बिल्डिंग A मधील गाळा क्र.५ एकूण क्षेत्र १७.१३ स्वे. फुट अशी मिळकत असून या मिळकतीस मयत श्री..मोहमद इसाक कासिम शेख यांचे नाव लागलेले आहे. सदर मिळकत ही लोखंडवाला बिल्डिंगमध्ये असून त्याच्या चतुः सीमा पूर्वेस १८.२९ मी. रुंदीचा रस्ता, दक्षिणेस बिल्डिंगचा उर्वरित भाग, पश्चिमेस:– प्लॉट नं.६ आणि १७ आणि रस्ता, उत्तरेस:– १५ मी. रुंदीचा रस्ता असे असून त्यापैकी सामाईक क्षेत्रास सदर मिळकतीचे सिटी सर्वे उताऱ्यावरून मयत श्री. मोहमद इसाक कासिम शेख यांच्या नावाची नोंद कमी होऊन वारसदार म्हणून अर्जदार यांच्या नावाची नोंद होणेकमी वारसा दाखला मिळवा, या कारणासाठी अर्जदार यांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, जर कोणास वरील अर्जदार यांच्या नावाने वारसा दाखला देण्यासंबंधी काही म्हणणे, हरकत असल्यास त्यांनी ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत अथवा नेमलेली तारीख ८/९/२०२५ रोजी मे न्यायालयात हजर राहावे. तसे न झाल्यास अर्जदार यांच्या नावाने वारस प्रमाण पत्रास कोणाची हरकत नाही असे समजून अर्जदार यांचे नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. ही जाहीर नोटिस माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी आहे. दिनांक ११/०८/२०२५

**हुकूमावरुन**
**सहा अधिक्षक**
**लिपिक** (शिक्का) **दिवाणी न्यायाधिश व.स्तर,सोलापूर.**

## जाहीर प्रसिध्दीकरण

**दि.कि.अर्ज क्र: ६३१/२०२५ नि.६**

**सोलापूर येथील मे.सिव्हील जज सीनियर डिव्हिजन मे.कंखरे सो यांच्या कोर्टात,**

१) रोहित योगेशकुमार इटाई
( मयत – वर्षा योगेशकुमार इटाई यांचा मुलगा )
वय :– ३० वर्ष व्यवसाय :– व्यापार
२ ) योगेशकुमार रमाकांत इटाई
( मयत – वर्षा योगेशकुमार इटाई यांचे पती ) **}अर्जदार**
वय :– ६३ वर्ष व्यवसाय :– रिटायर्ड
३) अभिजीत योगेशकुमार इटाई
( मयत – वर्षा योगेशकुमार इटाई यांचा मुलगा )
वय :– ३४ वर्ष व्यवसाय :– डॉक्टर
सर्व रा.१ ब/१ अ/१क मुरारजी पेठ,
दुध पंढरीजवळ, सोलापूर

**विरुद्ध**
कोणी नाही **}सामनेवाला**

ज्यार्थी, अर्जदार यांनी सदरचा अर्ज वारसा दाखला मिळणे करता दाखल केलेला आहे, मिळकतीचे वर्णन -:-BANK OF MAHARASHTRA, BRANCH NAVI PETH SOLAPUR बचत खाता क्र – २००६३२५११९१ मधील रक्कम व व्याज Rs. ३२,१२४.७२ /- (In Words - Thirty Two Thousand One Hundred Twenty Four and Paise Seventy Two Only), ३०/०४/२०२५ अखेर शिल्लक व . BANK OF MAHARASHTR-BRANCH NAVI PETH SOLAPUR चालू खाता क्र – ६०३०४४२८१२८ मधील रक्कम ६,२३८.६९ ( Six Thousand Two Hundred Thirty Eight and paise Sixty Nine ) as on ३१/३/२०२५ त्यांच्या मृत्यू पश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत . येणेप्रमाणे वरील नमूद मिळकती मध्ये अर्जदार यांचे वारसांचा नावांची नोंद होणे कामी वारसा दाखला मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याआर्थी जर कोणास वरील अर्जदार यांच्या नावाने वारसा दाखला देणे संबंधी काही म्हणणे, हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत अथवा नेमलेले तारीख १२/९ / २०२५ रोजी, मे. कोर्टात हजर राहावे. तसे न झाल्यास अर्जदार यांच्या नावाने वारस प्रमाणपत्र कोणाची काहीही हरकत नाही असे समजून अर्जदार यांचे नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. ही जाहीर नोटीस माझ्या सहीनीशी व मे. कोर्टाच्या शिक्यानिशी दिली असे. तारीख : ११/०८/२०२५

**हुकूमावरुन**
**सहा अधिक्षक**
**लिपिक** (शिक्का) **दिवाणी न्यायाधिश व.स्तर,सोलापूर.**

## चौकशीची जाहीर नोटीस

**योजना अर्ज क्रमांक १०९९/२०२५, कलम५०अ (३)**

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय सोलापूर**

सार्वजनिक न्यासाचे नाव श्री संत सेना महाराज देवस्थान, बाबत ।
न्यासाचा पत्ता :– पंढरपूर रोड, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर
नोंदणी क्र. : अ – १५९९ / सोलापूर
१) श्री. नागनाथ सुभाष चौधरी
रा. नागनाथ गल्ली, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर
२) श्री. गजानन शंकर माने
रा. भोसले वस्ती नं. १, पोखरापूर, ता. मोहोळ, जि. सोलापूर **} अर्जदार**

सर्व संबंधीत लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर विभाग सोलापूर हे वर नमूद केलेल्या अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे ५० अ (३) अन्वये योजना अर्ज केलेला आहे. सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आंत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही, असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व मा.धर्मादाय उपायुक्त सो, सोलापूर यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ११/८/२०२५ रोजी दिली.

(कोर्टाचा शिक्का)

**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,सोलापूर**